**पाहिजेत**
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ४० वा | गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# रेल्वे ट्रॅक उखडू, विमानं उडू देणार नाही; १० लाख मराठे मुंबईत धडकणार

## मनोज जरांगेंचा फडणवीस सरकारला इशारा

**अंतरवलीसराटी (कटूसत्य वृत्त):-** मुंबईत ९० लाख मराठे मुंबईत घुसतील. तुम्ही काय करता ते बघू घेऊ. आम्ही रेल्वे पण फिरू देणार, नाही विमान उडू देणार नाही. सगळ्या रेल्वे पट्या उखडून टाकू. यावेळी मराठे 45 लाख गाडी घेऊन मुंबईत घुसणार आहेत, असा गंभीर इशारा मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिलाय. दक्षिण मुंबईतील मोर्चे आणि आंदोलनांबाबत नवे नियम लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्यानंतर जरांगे-पाटील आक्रमक झालेत.

यावेळी जरांगे पाटील यांनी मुंबईत भगवं वादळ धडकणारच, असं म्हणत आम्हाला कोण अडवतंय, ते बघतोच, असा इशारा दिलाय. मराठ्यांना आंदोलनापासून रोखण्याचा निर्णय सरकारनं घेणं यामुळे त्यांच्याविरोधात असंतोष निर्माण होतोय. ज्या जनतेनं, ज्या मराठी जनतेनं त्यांना सत्तेत बसवलंय, त्यांना हे सरकार मुंबईत येण्यापासून रोखतंय.

जनतेनं सत्ता दिली, कायदा हातात दिला आणि सरकार त्यांचा उपयोग जनतेच्या विरोधात करतंय. सरकार सत्तेचा गैरवापर करतंय, असा आरोपही जरांगे पाटील यांनी केलाय. ज्यांना आपलं म्हणून सत्तेत बसवलंय, आपले फडणवीस, आपले शिंदे म्हणून त्यांना सत्ता दिली, तेच आता आम्हाला मुंबईत येऊ नका असा म्हणत आहेत. सत्ता म्हणजे काय पाच मिनिटे टिकू देणार नाही, अशा गंभीर इशारा जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलाय.

सरकार दादागिरी करत आहे, पण आम्ही त्याला दाद देत नाहीत, त्याला जुमानत आहे. मात्र आम्ही कायदा नक्कीच मानतो, त्यामुळे मुंबईत येणारच. त्यासाठी आधीच मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांना



मुंबईत येण्यासाठी परवानगी मागितलीय. आंदोलनाचे परवानगी निवेदन आधीच देण्यात आलंय. जर परवानगी दिली नाही तर तुम्ही कायद्याचा सन्मान करत नाही हे सिद्ध होतं. पण मुंबईत आम्ही येणारच तुम्ही परवानगी द्या नाहीतर नका देऊ. आमचं ठरलंय, मी जाणार रात्रंदिवस बसणार तुम्ही काय करणार ते आम्ही बघणार, तुम्ही मुंबईत कसे अडवतात हे पण बघतो, असा जरांगे पाटील यांनी फडणवीस सरकारला दिलाय.

तुम्हाला मुंबईत अडथळा नको तर आमचे प्रश्न सोडवा, तुम्हाला प्रश्न सोडवायचे नाही सत्तेतही बसायचं नाही. मुंबईतील बांधवांनी समजून घ्या, आमच्यामुळे तुम्हाला त्रास होईल का तर एखाद्या वेळेस नक्की होईल आम्हाला दहा-पंधरा दिवस सांभाळून घ्या, आम्ही तुमचेच आहे लोकाचे नाही, असं आवाहनही जरांगेंनी मुंबईकरांना केलंय.

### मुख्यमंत्र्यांना गंभीर इशारा

तुम्ही एकदा आमच्यावर हल्ला केलेला आहे, आता पुन्हा फडणवीस नादाला पडायचं नाही, आता आम्ही सावध आहोत. तुमच्यावर सगळ्यांचा राग आहे. दादागिरी करायची नाही. आम्ही आंदोलन आझाद मैदानला करणार, शिवाजी पार्कला करणार वषार्पुढेही करणार सगळ्या दुनियात करणार. जिथे आम्हाला रोड दिसेल तिथे आंदोलन करणार. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नादी लागू नका माज्या. पोलिसांच्या जीवावर तुम्ही खेळ खंडोबा करायचा काम करू नका, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिलाय.

**सरकारने हे मुद्दाम केले**

दक्षिण मुंबईतील आंदोलनांसाठी राज्य सरकारने नवे नियम लागू केले आहेत. आझाद मैदानाव्यतिरिक्त दक्षिण मुंबईतील अन्य कोणत्याही ठिकाणी आंदोलन, धरणे किंवा मोर्चा काढण्यास मनाई केली आहे. मराठे मुंबईत जाणार आहे त्यामुळे मुद्दामून सरकारने हे केलं, यात झाकून ठेवण्यासारखं काहीच नाही. सरकार विरोधात रोज यामुळे जात आहे, लोकांनी यांना सत्तेवर बसवले मराठ्यांनी यांना सत्तेवर बसवले. त्याच गोरगरीब मराठ्यांना मुंबईत येण्यापासून रोखणं म्हणजे रोष वाढण्याचे कारण फक्त सरकार आहे. तुमच्या कायदा हातात आम्ही देतो सत्ता आम्ही तुमच्या हातात देतो आणि तुम्ही त्याचा गैरवापर करता. लोक यासाठी तुम्हाला निवडून देतात की आपण कसले परिस्थितीत मुंबईला जर गेलो आपलं सरकार तिथे आहे आपले फडवणीस आपले शिंदे आपले दादा बसले तिथे. जे आपले म्हणून बसवले तेच मुंबईत येऊ नका म्हणतात, ही खूप मोठी दहशत झाली. ही सरकारची दादागिरी झाली ही चालत नसते, असा सज्जड दम त्यांनी दिला.

**आम्ही मोजत नसतो**

आम्ही मोजत नसतो आणि ऐकतही नसतो आम्ही कायद्याचा सन्मान करतो, आम्ही तुम्हाला परवानगीचा अर्ज दिला आहे. तुम्ही परवानगी द्या नाहीतर नका देऊ. मी जात असतो ठरलं आमचं द्यायचं मी जाणार रात्रंदिवस बसणार तुम्ही काय करणार ते आम्ही बघणार, तुम्ही मुंबईत कसे अडवतात हे पण बघतो. तुम्हाला मुंबईत अडथळा नको तर आमचे प्रश्न सोडवा, तुम्हाला प्रश्न सोडवायचे नाही सत्तेतही बसायचं नाही, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

मुंबईतील बांधवांनी समजून घ्या, आमच्यामुळे तुम्हाला त्रास होईल का तर एखाद्या वेळेस नक्की होईल आम्हाला दहा-पंधरा दिवस सांभाळून घ्या. आम्ही तुमचेच आहे लोकाचे नाही. मुंबईत कोणीच सुखी नाही ,आम्ही त्यांना नीट करायला यायला लागलो. जर ठरलं तर मुंबईत येणार वर्षावरच येणार ,तुमच्या बापाची पेंड आहे का इकडे येऊ नको तिकडे येऊ नको म्हणायला, असा संताप त्यांनी व्यक्त केला. अशा नोटीसा पाठवणं म्हणजे लोकांवर जुलूम नाही का, असा सवाल जरांगे पाटील यांनी व्यक्त केला.

## समृद्धी क्रीडा सेवा पुरस्कार जाहीर; रामजी कश्यप, श्रावणी सूर्यवंशी मानकरी

### श्रीकांत शेटे प्रशिक्षक तर राजीव देसाई संघटक पुरस्काराचे मानकरी; २९ ऑगस्टला पुरस्कार वितरण

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून समृद्धी कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, सोलापूर अंतर्गत समृद्धी स्पोर्ट्स क्लबच्या वतीने देण्यात येणाऱ्या समृद्धी क्रीडा सेवा पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यंदा खो-खोतील आंतरराष्ट्रीय खेळाडू रामजी कश्यप आणि जलतरण व डायव्हिंगमधील आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रावणी सूर्यवंशी यांची खेळाडू पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. तसेच आंतरराष्ट्रीय डायव्हिंग प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांना प्रशिक्षक पुरस्कार, तर लॉन टेनिस क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटक राजीव देसाई यांना संघटक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

समृद्धी स्पोर्ट्स क्लबचे संस्थापक-सचिव संजय सावंत यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. जिल्ह्यातील खेळाडू, प्रशिक्षक आणि क्रीडा संघटक यांच्या




उल्लेखनीय कामगिरीला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या योगदानाचा गौरव व्हावा, या उद्देशाने समृद्धी स्पोर्ट्स क्लबच्या माध्यमातून हे पुरस्कार दिले जातात. पुरस्काराचे हे दुसरे वर्ष आहे.

**शनिवारी पुरस्कार वितरण**

समृद्धी क्रीडा सेवा पुरस्कारांचे वितरण शनिवार, दि. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता निर्मलकुमार फडकुले सभागृह, सोलापूर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात समृद्धी स्पोर्ट्स क्लबच्या ५० राष्ट्रीय खेळाडूंचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

पुरस्कारासाठी निवड झालेल्या पुरुष व महिला खेळाडूंना प्रत्येकी ३ हजार १०० रुपये रोख, मानपत्र, सन्मानचिन्ह आणि शाल देऊन गौरविण्यात येणार आहे. प्रशिक्षक आणि क्रीडा संघटकांना मानपत्र, सन्मानचिन्ह व शाल देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**निवड समितीकडून निवड**

या पुरस्कारासाठी क्रीडा पत्रकार अजितकुमार संगवे, माजी तालुका क्रीडाधिकारी व आंतरराष्ट्रीय खो-खोपटू सत्येन जाधव तसेच तालुका क्रीडाधिकारी गणेश पवार यांची निवड समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने विविध खेळाडू, प्रशिक्षक व क्रीडा संघटकांच्या कामगिरीचा आढावा घेऊन पुरस्कारासाठी मानकऱ्यांची निवड केली.



**समृद्धी क्लबच्या या 50 राष्ट्रीय खेळाडूंचा होणार सन्मान :**

ॲथलेटिक्स : बिभीषण गुंड(शिवणी), पूजा राठोड (घोडातांडा)

खो-खो : अर्चना व्हणमाने (नंदूर), किरण लेंडवे (फटेवाडी), सागर लेंगरे, सुहास आसबे, आकाश हजारे, प्रविण गोवे (मंगळवेढा)

सेपक टकरा : भक्ती घुले, नम्रता घुले (चिंचुबे), प्रणिता लेंडवे, संकेत बिले, गणेश बिले (पाटखळ), शिवराज बेदरे, स्नेहा घोडके (बठाण), साक्षी शिंदे, स्नेहलता दुधाळ, प्रगती शिंदे (खवे), अमृता जाधव (सिद्धेवाडी), नम्रता सुळकुंडे (येड्राव),कल्याणी बिले, संचिता पवार, स्नेहा कदम, सानिका इंगोले, प्रणिती नागणे, प्रतिज्ञा मोरे, ऐश्वर्या कादे, संजना कोळी, वैष्णवी वाघ, सई कोळी, पूर्वी जाधव, भक्ती नागणे, शिवतेज कदम, समरजित कदम, विश्वजीत वाघ (मंगळवेढा),

शुटिंगबॉल : अमजद जेलर, शोएब बेगमपुरे, रफी दिवाण, श्रीनिवास कामुर्ती, महमूद मडकी, अमन शेख, फरहान शेख,अलिम बुशरा, अनम रंगरेज,मिसबा पटेल, निखत बागवान, मुस्कान बागवान,नौशिन चांदा, आल्फिया शेख (सर्व सोलापूर), आर्शिया इनामदार (आहेरवाडी).

**पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन**

पुरस्कार वितरण सोहळा यशस्वी करण्यासाठी क्लबचे अध्यक्ष राजू प्याटी, उपाध्यक्ष रामचंद्र दत्तू व अंबादास पांढरे, कार्यकारी अध्यक्ष शोएब बेगमपुरे, कार्याध्यक्ष सुरेश भोसले, सल्लागार चंद्रकांत होळकर, रमेश बसाटे, मल्हारी बनसोडे, कृष्णकांत चव्हाण, अविनाश गोडसे, फैजअहमद बेगमपूरे, संजय अंबोले, बाबासाहेब माने आणि श्रीनिवास कामुर्ती यांच्या मार्गदर्शनाखाली तयारी सुरू आहे.

तसेच तुकाराम शेंडगे, बी. डी. राठोड, संतोष जाधव, पुंडलिक कलखांबकर, गणेश कुडले, शाहनवाज मुल्ला, प्रमोद कुरकुळ्ळी, श्रीमंत कोळी, शिवाजी वसपटे आणि व्यंकप्पा शेंडगे हे सदस्य पुरस्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

## सोलापूरसह राज्यात परतीच्या मॉन्सूनचा दमदार पाऊस होण्याची शक्यता

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ऑगस्टअखेरपर्यंत तापमानात वाढ होण्याची शक्यता असून, राजस्थानमध्ये हवेचा दाब कमी झाल्यानंतर साधारण १ सप्टेंबरपासून मॉन्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात होण्याचा अंदाज हवामान तज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांनी व्यक्त केला आहे.

परतीच्या मॉन्सूनदरम्यान सोलापूरसह महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत दमदार पाऊस होण्याची शक्यता आहे.

जून-जुलै महिन्यांत अपेक्षित पाऊस न झाल्याने सोलापूर जिल्ह्यातील खरीप पिकांना मोठा फटका बसला आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांचे लक्ष रब्बी हंगामासाठी महत्त्वाच्या असलेल्या परतीच्या पावसाकडे लागले आहे. परतीच्या काळात चांगला पाऊस झाल्यास ज्वारी, करडई यांसारखी रब्बी पिके घेण्यास शेतकऱ्यांना मदत होऊ शकते.

सध्याच्या हवामान स्थितीचा दाखला देताना डॉ. साबळे यांनी अल निनोचा प्रभाव कमी झाल्याने यंदाचा परतीचा मॉन्सून



चांगला राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. राजस्थानमध्ये हवेचा दाब कमी झाल्यानंतर मॉन्सूनच्या माघारीच्या हालचाली सुरू होण्याची शक्यता असून, त्याचा परिणाम महाराष्ट्रातील पावसावरही होऊ शकतो.

सोलापूरसह महाराष्ट्रातील सुमारे १५ जिल्हे आणि ८४ तालुके परतीच्या पावसावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असल्याचे डॉ. साबळे यांनी सांगितले. त्यामुळे आगामी काळातील पावसाचे प्रमाण रब्बी हंगामाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

खरीप हंगामातील नुकसान भरून काढण्यासाठी परतीचा पाऊस उपयुक्त ठरावा, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. दमदार पाऊस झाल्यास जमिनीतील ओलावा वाढून रब्बी पिकांच्या पेरणीसाठी पोषक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

## कुंभमेळ्यावर खर्च करण्यापेक्षा शाळा उभारा

### न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांचा सरकारला सवाल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** देशाच्या आणि राज्याच्या विकासासाठी मोठमोठ्या प्रकल्पांवर कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात असताना दुसरीकडे ग्रामीण आणि दुर्गम भागातील अनेक शाळा अद्याप मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. अशा परिस्थितीत कुंभमेळ्यासारख्या मोठ्या धार्मिक आयोजनांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यापेक्षा तोच पैसा शाळांच्या भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि भविष्यासाठी खर्च केला पाहिजे, असे परखड मत न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांनी व्यक्त केले.

शिक्षण ही समाजाच्या प्रगतीची खरी पायाभरणी आहे. मात्र आजही अनेक शाळांच्या इमारती जीर्ण आहेत, वर्गखोल्यांची कमतरता आहे, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, संगणक, प्रयोगशाळा, ग्रंथालय यांसारख्या मूलभूत सुविधा अपुऱ्या आहेत. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना धोकादायक इमारतीत शिक्षण घ्यावे लागत असल्याची वस्तुस्थिती आहे. अशा वेळी सार्वजनिक निधीच्या प्राधान्यक्रमावर गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे वराळे यांनी स्पष्ट केले.

'धार्मिक कार्यक्रमांना विरोध नाही; मात्र सरकारच्या निधीचा वापर करताना शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत सुविधांना सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे,ह्व असा व्यापक आशय त्यांच्या भूमिकेतून पुढे आला. धार्मिक आयोजन तात्पुरते असते; मात्र चांगली शाळा आणि दर्जेदार शिक्षणाची उभारणी ही अनेक पिढ्यांचे भविष्य घडवते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

**शाळा सुधारल्या तर पिढ्या घडतील**

आजच्या विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकांचे शिक्षण पुरेसे नाही. डिजिटल शिक्षण, विज्ञान प्रयोगशाळा, क्रीडा सुविधा, ग्रंथालय, कौशल्याधारित शिक्षण आणि सुरक्षित शैक्षणिक वातावरण ही काळाची गरज आहे. सरकारने मोठ्या खर्चाच्या योजनांबरोबरच प्रत्येक गावातील शाळेची स्थिती तपासून 'शाळा प्रथम' या दृष्टिकोनातून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणेच दर्जेदार सुविधा मिळाल्या तर त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला मोठी चालना मिळू शकते. सरकारी शाळांमध्ये सुविधा निर्माण झाल्यास पालकांचा विश्वास वाढेल आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळेल.

**सार्वजनिक पैशाचा हिशेब जनतेला द्या**

सरकारकडून होणारा प्रत्येक रुपयाचा खर्च हा जनतेच्या पैशातून होतो. त्यामुळे मोठ्या धार्मिक, सांस्कृतिक किंवा अन्य आयोजनांवर खर्च करताना त्याची सामाजिक उपयुक्तता आणि दीर्घकालीन परिणाम यांचा विचार होणे आवश्यक आहे. त्याचवेळी शाळा, रुग्णालये, पाणी, रस्ते आणि विद्यार्थ्यांच्या मूलभूत गरजा प्रलंबित राहणार नाहीत, याची हमी सरकारने द्यावी, अशी मागणीही जोर धरत आहे.

न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांच्या या भूमिकेमुळे ह्वविकासाचा खरा प्राधान्यक्रम कोणता ?ह्व हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. धार्मिक आस्था आणि सार्वजनिक विकास यांच्यात संघर्ष निर्माण करण्याऐवजी सार्वजनिक निधीचा विवेकपूर्ण वापर करून शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवण्याची गरज असल्याचे या निमित्ताने अधोरेखित झाले आहे.

कुंभमेळा होईल, धार्मिक आयोजनं होतील; मात्र एका विद्यार्थ्याची शाळा सुधारली तर त्याचा परिणाम संपूर्ण आयुष्यावर होतो. त्यामुळे उत्सवांपेक्षा भविष्य घडविणाऱ्या शिक्षणावर खर्च करण्याची वेळ आली आहे, हा संदेश या भूमिकेतून स्पष्टपणे पुढे आला आहे.

## ड्रीम फाउंडेशन संचलित 'सिद्धेश्वर कृषी पर्यटन केंद्रा'त कृषी पर्यटनासह युवा उद्योगाला चालना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शेतकरी, युवक व महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासोबतच सोलापूर जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी ड्रीम फाउंडेशन संचलित 'श्री. सिद्धेश्वर कृषी पर्यटन केंद्र' व 'ड्रीम युवा बिझनेस फोरम'च्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री. सिद्धेश्वर कृषी पर्यटन केंद्राचा शुभारंभ शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी राम रेड्डी यांच्या हस्ते होणार आहे.

सोलापूर पर्यटन जागर अभियानांतर्गत सिद्धेश्वर कृषी पर्यटन केंद्रात फार्म हाऊस, होम स्टे, पारंपरिक खाद्य महोत्सव व हुर्डा महोत्सव आदी उपक्रम सुरू करण्यात येणार आहेत. राम रेड्डी, व्यवस्थापकीय संचालक बालाजी अमाईन्स, डॉ. अशोक नागरकर (वरिष्ठ वैज्ञानिक, ऊ्रऌ्ड पुणे), आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार शिवशरण आण्णा पाटील-बिराजदार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. तसेच श्री.प.पू. महांतेश स्वामीजी तडेवाडी मठ, कर्नाटक यांच्या दिव्य सान्निध्यात कार्यक्रम होणार असून सौ. गजराबाई भतगुणकी, गुरूशांत भतगुणकी यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

कुमठे शिवारा, मामुरे वस्ती, सोरेगाव तसेच कुमठे रोड व विजापूर रोड परिसरात हे कृषी पर्यटन केंद्र विकसित करण्यात आले आहे. ड्रीम फाउंडेशनच्या माध्यमातून मागील २९ वर्षांपासून शेतकरी, युवक व महिलांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यात येत असल्याची माहिती केंद्राचे संचालक काशिनाथ भतगुणकी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर शहर व जिल्ह्यातील विविध खाद्यपदार्थांची देशभरात ब्रँडिंग करण्याबरोबरच जिल्ह्यातील धार्मिक व ऐतिहासिक पर्यटनस्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कृषी पर्यटन केंद्रात गार्डन, वनराई, आमराई, नारळाचे वन, सेंद्रिय भाजीपाला प्रकल्प, गो-शाळा, भाकरी बेक, हुर्डा पार्टीसाठी सुविधा तसेच मोठ्या



कार्यक्रमांसाठी हॉल व लॉन आणि १२ खोल्यांची स्वतंत्र निवास व्यवस्था करण्यात आली आहे. ग्रामीण संस्कृती, योगा, मेडिटेशन व निसर्गरम्य वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी हे केंद्र उपयुक्त ठरणार आहे.

कृषी पर्यटन केंद्राच्या उद्घाटनानिमित्त राजभरातील विविध मान्यवर मार्गदर्शनासाठी उपस्थित राहणार आहेत. यामध्ये वेल्दी लाईफचे संचालक धनंजय शेंडे, वेलनेस कोच तुकाराम पाटील, सौ. सुप्रिया करपे, अशोक टेंगमळे (लातूर), अमोल तळेकर (जालना), किरण पाटील (लातूर) यांचा समावेश आहे.

दरम्यान, रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ड्रीम युवा बिझनेस फोरमचे उद्घाटन चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष पेठ्या गड्डू, राजू राठी, सारथी फाउंडेशनचे अध्यक्ष केतन शहा यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मिलिंद भोसले, अमित कामितकर, प्रसाद कानडे व दिलीप पंतगे आदी उपस्थित राहणार असून नवउद्योजकांना उद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शन मिळणार आहे.

ड्रीम युवा फोरमतर्फे दर सोमवारी शेतकऱ्यांना, दर बुधवारी उद्योजकांना, दर शुक्रवारी महिलांना आणि दर रविवारी सर्वांसाठी उद्योग मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती फोरमचे अध्यक्ष सतीश पाटील व संचालिका संगीता भतगुणकी यांनी दिली.

वरील कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक रमेश बिराजदार, बसलिंगप्पा हिप्परगी, परमेश्वर भतगुणकी व कल्पना भतगुणकी यांनी केले आहे.

## संपादकीय

# 'स्कूल' नाही, आधी 'सिस्टीम ठीक करो'.!

'स्कूल ठीक करो' या मोहिमेने शालेय शिक्षण चर्चेच्या केंद्रस्थानी आणले, ही स्वागतार्ह बाब असली तरी या अभियानाची दिशा आता बदलण्याची गरज आहे. सीजेपी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी आता आपल्या मोहिमेचा रोख धोरणकर्त्यांकडे वळवणे गरजेचे आहे.

शाळेच्या प्रांगणात किंवा वर्गात केर काढणार्या एका चिमुरड्या हाताचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर येतो, अल्पावधीत तो लाखो लोकांपर्यंत पोहोचतो आणि काही क्षणांतच समाजमाध्यमांच्या स्वघोषित न्यायालयांतून एकतर्फी निकाल जाहीर केला जातो- 'पहा, सरकारी शाळांमधील शिक्षक मुलांचे कसे शोषण करत आहेत!', 'कॉकरोच जनता पार्टी'चे (सीजेपी) प्रमुख अभिजीत दिपके असोत किंवा कॅमेरा हातात घेऊन शाळेत शिरणारे कार्यकर्ते... शिक्षकांना थेट विद्यार्थ्यांसमोर संशयिताच्या पिंजर्यात उभे करून सुनावणे आजकाल सोपे झाले आहे, पण संताप व्यक्त करणार्यांनी कधी स्वतःला हा मूलभूत प्रश्न विचारला आहे का, की त्या चिमुरड्यांच्या हातात झाडू देण्याची वेळ नेमकी कोणत्या व्यवस्थेने आणली आहे?

खासगी किंवा नामांकित कॉन्व्हेंट शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. या शाळा वंचित, शेतमजूर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल वगातील मुलांचे शिक्षणाचे एकमेव आश्रयस्थान असतात. राज्यातील हजारो प्राथमिक शाळांमध्ये स्वच्छता, देखरेख आणि शिपायाची कामे करण्यासाठी स्वतंत्र चतुर्थश्रेणी कर्मचारी नेमला गेलेलाच नाही. शिक्षक संघटनांची ही मागणी अनेक दशकांपासून प्रलंबित आहे. केवळ शिपाईच नव्हे, तर तुटपुंज्या शिक्षक संख्येत दोन-तीन वर्गांची एकत्र शाळा भरवण्याची कसरत हजारो शिक्षक रोज करत आहेत. आज शेकडो शाळांना साधे वीजबिल भरण्यासाठी पुरेसा निधी मिळत नाही; परिणामी वीज जोडण्या तोडल्या जातात आणि अंधार्या वर्गात शिकण्याची वेळ मुलांवर येते. ग्रामपंचायती स्वतः आर्थिक अडचणीत आणि परावलंबी असताना त्या शाळांच्या देखभालीचा खर्च कुठून करणार? रंग उडालेल्या भिंती, पडकी स्वच्छतागृहे, गळणारी छपरे आणि पिण्याच्या पाण्याची अपुरी सोय अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षक स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून शाळा चालवतात. भौतिक सुविधा, पुरेसा निधी आणि स्वच्छता कर्मचारी उपलब्ध करून देणे ही शासनाची मूलभूत जबाबदारी असताना, या अपयशाचे खापर केवळ शिक्षकांवर फोडून मोकळे होणे अन्यायकारक आहे.

शाळा सुधारायची असेल तर सर्वात पहिली आणि अनिवार्य पायरी म्हणजे शिक्षकाला केवळ 'शिकवण्यासाठी' मोकळे ठेवणे. आज शिक्षकांचा बहुतांश वेळ शिकवण्याऐवजी यू-डायस, सरल प्रणाली, स्टुडंट पोर्टल, अपार आयडी निर्मिती, आधार प्रमाणीकरण आणि दैनंदिन गुगल फॉर्म्स भरण्यातच खर्ची पडतो. याशिवाय मतदार याद्यांचे काम, बीएलओ ड्युटी, विविध सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणे, जनगणना, आणि प्रधानमंत्री पोषण आहार योजनेतील धान्याची आवक-जावक, चव नोंदवही, लाभार्थी नोंदी व खचार्चे क्लिष्ट हिशेब सांभाळण्यातच शिक्षकांची सर्व ऊर्जा संपून जाते. शिक्षकाच्या हातात खडू ऐवजी कायम मोबाईल आणि लॅपटॉप दिला, तर वगातील मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे काय होणार? एका बाजूला गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या घोषणा केल्या जात असताना दुसर्या बाजूला शिक्षकाला विविध प्रशासकीय विभागांच्या माहिती संकलनाचे साधन असल्याप्रमाणे वागवणे, ही शासनाची दुटप्पी नीती या दुरवस्थेला कारणीभूत आहे. केंद्र पातळीवर स्वतंत्र डेटा एन्ट्री ऑपरेटर आणि प्रत्येक शाळेला शिपाई दिले, तर शिक्षकांचा वेळ वाचेल आणि लाखो सुशिक्षित बेरोजगारांना हक्काचा रोजगारही मिळेल.

'स्कूल ठीक करो' या मोहिमेने शालेय शिक्षणाला चर्चेच्या केंद्रस्थानी आणले आहे, हे स्वागतार्ह असले तरी या अभियानाची दिशा आता बदलण्याची नितांत गरज आहे. केवळ सरकारी शाळांमध्ये जाऊन उणिवांचे सनसनाटी व्हिडीओ चित्रित करणे आणि शिक्षकांना मुलांसमोर अपमानित करणे यामुळे सार्वजनिक शिक्षणव्यवस्थेविषयी समाजात अविश्वासाची भावना वाढीस लागते. पालक घाबरून आपल्या मुलांना अवाढव्य फी आकारणार्या खासगी शाळांच्या जाळ्यात ढकलतात, ज्यामुळे अंतिमतः बहुजन आणि गरीब मुलांचेच नुकसान होते.

सीजेपी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी आता आपल्या मोहिमेचा रोख थेट धोरणकर्त्यांकडे वळवणे गरजेचे आहे. ज्या नामांकित खासगी शाळांना आदिवासी विकास प्रकल्पातून अनुसूचित जमातीतील मुलांच्या शिक्षण व निवासासाठी प्रति विद्यार्थी वार्षिक ७० हजार रुपये दिले जातात, किंवा आरटीईच्या २५ टक्के कोट्यातून कोट्यवधी रुपयांचे सरकारी अनुदान मिळते, त्या शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांच्या जेवणाचा दर्जा, वसतिगृहांची अवस्था आणि शैक्षणिक ऑडिट करण्याची हिंमत या मोहिमेने दाखवली पाहिजे. मनमानी फी उकळणार्या आणि शिक्षण अधिकार्यांनाही न जुमानणार्या खासगी शाळांच्या मुजोरीला जाब विचारला पाहिजे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार शिक्षणावर सकल देशांतर्गत उत्पादनाच्या सहा टक्के निधी खर्च करण्याची तरतूद कागदावरून प्रत्यक्षात आणण्यासाठी, शाळांना वीजबिल व देखभालीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतूद मिळवून देण्यासाठी आणि प्रत्येक शाळेला शिपाई व संगणक चालक उपलब्ध करून देण्यासाठी ही मोहीम मंत्रालयाच्या दारावर धडकली, तर संपूर्ण शिक्षक समाज तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील. शाळा ही केवळ सिमेंट-विटांची निर्जीव इमारत नसून ती शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि समाजाच्या विश्वासावर उभी असलेली जिवंत संस्था आहे.

आजच्या घडीला आपल्या शिक्षण व्यवस्थेकडून अपेक्षा तरी काय आहेत? पहिली आणि सर्वात मूलभूत अपेक्षा म्हणजे धोरणकर्त्यांनी सरकारी शाळांकडे 'ओझे' किंवा 'दायित्व' म्हणून न पाहता राष्ट्राच्या भविष्यातील 'गुंतवणूक' म्हणून पाहावे. व्यवस्थेतील सर्वात मोठी उणीव ही आहे की ती कागदी अहवाल आणि आकड्यांच्या जंजाळात गुंतून पडली असून, वगातील जिवंत संवादाचा तिला विसर पडला आहे. वरून लादल्या जाणार्या वारंवार बदलणार्या योजना, नको त्या प्रशिक्षणांचा पाऊस आणि वास्तवाचा लवलेश नसलेले फतवे यामुळे शाळांची स्वायत्तता नष्ट झाली आहे.

सरकारी शाळांमधील भौतिक सुविधा, मनुष्यबळ आणि पटसंख्येचा अधिकृत यू-डायस (व- ऊकरए) अहवाल पाहिला तर शिक्षण व्यवस्थेचे विदारक वास्तव डोळ्यांसमोर उभे राहते. आज देशभरातील सरकारी शाळांमध्ये तब्बल १० लाखांहून अधिक शिक्षकांची पदे रिक्त आहेत, तर महाराष्ट्रातही जिल्हा परिषद शाळांमध्ये ३० हजारांहून अधिक जागा रिक्त आहेत. परिणामी, राज्यातील हजारो प्राथमिक शाळा आजही केवळ 'एकशिक्षकी' किंवा 'द्विशिक्षकी' अवस्थेत सुरू आहेत. अनेक शाळांमध्ये इयत्तेनुसार स्वतंत्र वर्गखोल्यांची सोय नसल्यामुळे पहिली ते चौथी किंवा पाचवीच्या विद्यार्थ्यांना एकाच खोलीत एकत्र बसवून 'मल्टीग्रेड' पद्धतीने शिकवावे लागते. अशा परिस्थितीत एकाच शिक्षकाला एकाच वेळी तीन-चार वेगवेगळ्या अभ्यासक्रमांची कसरत करावी लागत असल्याने प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे पूर्णपणे अशक्य होते. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञानावर तसेच शैक्षणिक गुणवत्तेवर होतो; परिणामी गुणवत्तेच्या चिंतेपोटी पालक नाइलाजाने आपल्या मुलांना खासगी शाळांमध्ये घालतात आणि सरकारी शाळांमधील पटसंख्या झपाट्याने घटत जाते. याशिवाय पायाभूत सुविधांची आकडेवारी पाहिली तर देशातील एकूण १० लाखांहून अधिक सरकारी शाळांपैकी सुमारे ११ टक्के शाळांमध्ये मुलांसाठी तर ६.५ टक्क्यांपेक्षा जास्त शाळांमध्ये मुलींसाठी वापरात येण्याजोगी स्वतंत्र शौचालये उपलब्ध नाहीत. डिजिटल युगात देशातील ५२ टक्क्यांहून अधिक सरकारी शाळांमध्ये संगणक नाही, ६० टक्क्यांपेक्षा जास्त शाळांमध्ये इंटरनेट पोहोचलेले नाही आणि १३ टक्क्यांहून अधिक शाळांमध्ये नियमित वीजपुरवठा नाही. सुरक्षिततेच्या दृष्टीने सुमारे २९ टक्के सरकारी शाळांना साधी संरक्षक कुंपण भिंत नाही, २३ टक्क्यांपेक्षा जास्त शाळांना खेळाचे मैदान नाही आणि १४ टक्के शाळांमध्ये ग्रंथालय कक्ष नाही.

या सर्व भयावह परिस्थितीला आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या र्‍हासाला केवळ आणि केवळ ढिसाळ 'सिस्टिम'च पूर्णपणे जबाबदार आहे. हजारो शिक्षक पदे रिक्त ठेवणे, शाळांना वर्गखोल्या व मूलभूत पायाभूत सुविधा न पुरवणे, देखभालीसाठी हक्काचा निधी न देणे आणि शिक्षकांना अंतहीन अशैक्षणिक कामांच्या दलदलीत ढकलणे हा सर्व व्यवस्थेच्या अक्षम्य अनास्थेचा आणि चुकीच्या धोरणांचाच परिणाम आहे. व्यवस्थेने निर्माण केलेल्या या सर्व उणिवांचे खापर थेट शिक्षकांवर का फोडले जावे?

सरकारी शाळेचा वर्ग हा केवळ चार भिंतींचा नसतो, तर तो गरिबांच्या, शेतमजुरांच्या आणि वंचितांच्या मुलांच्या डोळ्यांतील स्वप्नांचे मंदिर असतो. त्या वर्गात बसणारे लेकरू अंगावर फाटके कपडे घालून येत असेल, पण त्याच्या डोळ्यांत आभाळ कवेत घेण्याची जिद्द असते. शिक्षक जेव्हा स्वतःच्या खिशातून पैसे टाकून त्या मुलाला वही-पेन देतो, त्याचे डोळे पुसतो आणि त्याला अक्षर ओळख करून देतो, तेव्हा ती कोणतीही शासकीय ड्युटी नसते तर ते एका पिढीचे घडणे असते. अशा शिक्षकाला व्यवस्थेच्या अपयशाचे बळी बनवून चव्हाट्यावर अपमानित केले जाणार असेल, तर ते केवळ शिक्षकाचे खच्चीकरण नसून त्या गोरगरिबांच्या स्वप्नांची केलेली क्रूर हत्या ठरेल.

महाराष्ट्रातील मेळघाट किंवा गडचिरोलीसारख्या दुर्गम आदिवासी पट्ट्यात व्यवस्थेचे विदारक वास्तव उघडे पडते. अनेक पाड्यांवर पावसाळ्यात पूल व रस्त्यांअभावी विद्यार्थी नदी-नाले पोहून शाळेत जातात; आश्रमशाळांमध्ये शुद्ध पाणी व आरोग्याअभावी साप-विंचू चावण्याच्या वा विषबाधेच्या घटना घडतात. रिक्त पदे आणि मूलभूत सुविधांची ही भीषण वानवा सिस्टिमच्या अपयशाची साक्ष देते.

यंत्रणेने शिक्षकाच्या हातातील खडूचा सन्मान करावा आणि समाजाने सरकारी शाळेच्या पाठीशी विश्वासाची ढाल बनून उभे राहावे. जेन झी पिढीने पेपरफुटीविरोधात पुकारलेल्या आंदोलनाला जसा देशातील सर्वच स्तरांतून उत्स्फूर्त आणि अभूतपूर्व पाठिंबा मिळाला, तशीच व्यापक लोकचळवळ जर 'स्कूल ठीक करो' च्या आधी 'शिक्षा सिस्टिम ठीक करो' यासाठी उभी राहिली, तर देशातील सर्व शिक्षक, पालक, शिक्षण- आणि जागरूक नागरिकांचा या चळवळीला नक्कीच प्रचंड प्रतिसाद लाभेल.

# पालकत्व शिकून घ्या!

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तिसगाव येथील खवड्या डोंगरावर आत्महत्या करण्यासाठी गेलेल्या १९ वर्षीय मुलाला वाचवण्याचा प्रयत्न करत असताना आई-वडिलांचाही दरीत पडून मृत्यू झाल्याची घटना मागील आठवड्यात घडली. ही बातमी वाचल्यानंतर मन सुन्न झाले. मनात एक प्रश्न उमटला—पालकत्व शिकवण्यासाठी शिकवणी वर्ग सुरू करावे लागतील का?

सुजाण पालकत्वासंबंधी पुस्तके ढिगाने प्रकाशित झाली आहेत. त्याचबरोबर आज विविध माध्यमांतून पालकत्वाचे धडे देणाऱ्या नंचे व्हिडिओही मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत. या घटनेनंतर शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांनी आपल्या फेसबुक वॉलवर हाच मुद्दा नेमक्या शब्दांत मांडला आहे. त्यांच्या मते—

'पालकांना कोणतेही पालकत्वाचे प्रशिक्षण नाही. आपल्या देशात पालक होण्यासाठी कोणतीही पदवी लागत नाही. साधी गाडी चालवण्यासाठी लायसन्स लागते; पण पालक होण्यासाठी कोणतीही अट नाही. पालकत्व हे काही शहरी फॅड नाही; ते अगदी गरीब कुटुंबालाही लागू आहे.'

आज पालकांसमोर पालक म्हणून अनेक प्रश्न उपस्थित करता येतील. पाल्यांचे पालनपोषण करणे हे नैसर्गिक राहिले आहे का? पाल्याला अपयश आले तर आपण त्याला कितपत समजून घेतो? स्पर्धा वाढली आहे, त्याचबरोबर पालकांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. पालकांना पाल्याच्या जागी जाऊन विचार करता आला पाहिजे. आपण दहावी, बारावी अथवा पदवी घेत असताना कोणकोणत्या संकटांवर मात केली? किती गोष्टी वाऱ्यावर सोडून दिल्या? आपण कितपत कष्ट घेतले? आणि आता आपण मुलांकडून कितपत कष्टाची अपेक्षा करत आहोत? लाड पुरवण्याच्या नादात आपण मुलांना कमतरतेची जाणीव करून देत आहोत का? आपल्या स्वतःच्या आर्थिक क्षमतेची जाणीव मुलांना स्पष्टपणे करून देत आहोत का? असे अनेक प्रश्न पालक-पाल्य नात्यासंबंधी निर्माण होत आहेत.

मुलांशी निकोप संवाद साधण्यात आपण जितके यशस्वी होऊ, तितके आपले पालकत्व यशस्वी होणार आहे. काही वेळा संवादाशिवायदेखील आपले वर्तन मुलांना आश्वासक वाटू शकते. पालक म्हणून आपली उपस्थिती, आपला स्पर्श आणि आपले विचार मुलांच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देत असतात. संवाद नेहमी शैक्षणिक वाटचाल, मिळणारे गुण अथवा भविष्यातील नोकऱ्या आणि संधी यांपुरता मर्यादित नसावा. मुलांबरोबर होणाऱ्या संवादात त्यांच्या विश्वात डोकावून पाहण्यापासून ते त्यांच्या आवडीनिवडी, खेळ आणि त्यांच्या भावविश्वाशी मैत्री जोडण्यापर्यंत अनेक गोष्टींचा समावेश असावा. सतत उपदेशाचे डोस पाजू लागल्यास मुले आपल्याला टाळू लागतील. ती आपल्यापासून दूर जातील. त्यांना आवडणाऱ्या विषयांवर आपण बोलू लागलो, तर मात्र मुले आपल्याशी मुक्तपणे संवाद साधू लागतील.

मुलेही आपलेच प्रतिबिंब आहेत, ही गोष्ट आपण ध्यानात घेतली पाहिजे. अनेक जैविक घटक आपण मुलांना दिलेले असतात. त्यांना मिळालेली शारीरिक संपन्नता अथवा काही कमतरता जन्मजात काही प्रमाणात आपल्यामुळे त्यांच्यात आलेली असते. त्यांच्या मनोवृत्ती आणि भावना यांमध्येही आपल्याशी साधर्म्य असू शकते. त्याचबरोबर आपण दिलेले प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संस्कारही मुलांना चांगले किंवा वाईट घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.मुलांना घडवण्यात पालकांचा सिंहाचा वाटा असतो, हे खरे आहे. म्हणून पालक म्हणून आवश्यक असणाऱ्या अनेक लहान-मोठ्या गोष्टी आपण शिकून घेतल्या पाहिजेत. सुजाण पालकत्वावरील पुस्तके वाचली पाहिजेत अथवा नंचे व्हिडिओ आवर्जून पाहिले पाहिजेत. मुलांच्या वर्तनात होणाऱ्या बदलांकडे बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे. मुलांमध्ये चुकीचे अथवा चिंताजनक वर्तन दिसून आल्यास मानसोपचारनंचे मार्गदर्शन घेतले पाहिजे.आपल्याला जे जे जमत नाही, ते शिकण्यात आणि स्वतःमधील कमतरता मान्य करण्यात कोणताही कमीपणा वाटून घेतला नाही पाहिजे.

ह्यमूल म्हणजे मातीचा गोळा आणि आपण पालक अथवा शिक्षक म्हणजे कुंभार; आपण त्याला आकार देण्याचे काम करत आहोत,' असे मानणे आता कालबाह्य झाले आहे. आजची मुले ही मातीचे गोळे राहू शकत नाहीत. त्यांच्या जाणीवा, ज्ञान आणि माहिती वाढवण्याची अनेक साधने उपलब्ध झाली आहेत. अशा काळात आपणदेखील पालक म्हणून पालकत्वासंबंधीचे ज्ञान, माहिती आणि जाणीवा याबाबत शिकून घेण्यास आणि त्यानुसार स्वतःच्या वर्तनात बदल करून घेण्यास काहीच हरकत नाही.

पालकत्व ही जन्मतः मिळणारी भूमिका असली, तरी सुजाण पालकत्व ही शिकण्याची प्रक्रिया आहे. ती आपण सर्वांनी मनापासून शिकून घेतली पाहिजे.



- **किशोर जाधव**, सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# अजरामर पार्श्वगायक मुकेश!

आज २७ ऑगस्ट, हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मुकेश यांचा स्मृतिदिन. आपल्या दर्दभऱ्या, भावस्पर्शी आणि मनाला भिडणाऱ्या आवाजाने तीन दशकांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे मुकेश आजही आपल्या स्वरांच्या माध्यमातून रसिकांच्या हृदयात जिवंत आहेत. त्यांच्या निधनाला अनेक दशके उलटली, तरी त्यांच्या आवाजाची जादू आजही कायम आहे.

२२ जुलै १९२३ रोजी दिल्ली येथे मुकेश यांचा जन्म झाला. त्यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथुर असे होते. त्यांचे बालपण दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौक परिसरात गेले. त्यांचे वडील जोरावर चंद माथुर हे अभियंता होते, तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना लहानपणापासूनच संगीताची विशेष आवड होती. त्या काळातील महान गायक कुंदनलाल सहगल यांचे ते निस्सीम चाहते होते. सहगल यांच्याप्रमाणेच अभिनेता आणि गायक होण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले.

मुकेश यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी घटना त्यांच्या एका नातेवाइकाच्या लग्नात घडली. त्या वेळी प्रसिद्ध अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना गाताना ऐकले. त्यांच्या आवाजाने मोतीलाल इतके प्रभावित झाले की, या तरुणाचा आवाज भविष्यात हिंदी चित्रपटसृष्टीत मोठी ओळख निर्माण करेल, असा त्यांना विश्वास वाटला. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यासाठी पंडित जगन्नाथ प्रसाद यांच्याकडे पाठवले.

मुकेश यांना अभिनयाचीही आवड होती. त्यांच्या देखण्या व्यक्तिमत्त्वामुळे त्यांना काही चित्रपटांमध्ये अभिनयाच्या संधी मिळाल्या. १९४१ मध्ये 'निर्दोष' या चित्रपटातून त्यांनी अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतरही त्यांनी काही चित्रपटांमध्ये भूमिका केल्या; मात्र अभिनय क्षेत्रात त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे नायक होण्याचे स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी आपले संपूर्ण लक्ष गायनाकडे केंद्रित केले.

१९४५ मध्ये 'पहली नजर' या चित्रपटातून मुकेश यांना पार्श्वगायक म्हणून मोठी संधी मिळाली. या चित्रपटातील 'दिल जलता है तो जलने दो' हे गीत अत्यंत लोकप्रिय झाले. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या गायनशैलीचा प्रभाव जाणवत होता. मात्र मुकेश यांनी पुढे स्वतःची स्वतंत्र शैली विकसित केली.

१९५८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'यहूदी' चित्रपटातील 'ये मेरा दीवानापन है' या गीताने मुकेश यांच्या गायकीला नवी दिशा दिली. या गीतातून त्यांचा स्वतंत्र, भावपूर्ण आणि दर्दभरा आवाज रसिकांसमोर ठळकपणे आला. त्यानंतर त्यांच्या कारकिर्दीने वेग घेतला. 'मेला', 'अंदाज' यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या गीतांनी त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेले.



मुकेश आणि राज कपूर यांचे नाते हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील एक अजरामर पर्व आहे. राज कपूर यांच्या पडद्यावरील व्यक्तिमत्त्वाला मुकेश यांच्या आवाजाने एक वेगळी भावनिक ओळख मिळवून दिली. 'आग', 'बरसात', 'आवारा', 'श्री ४२०', 'परवरिश', 'अनाडी', 'संगम', 'मेरा नाम जोकर' अशा अनेक चित्रपटांतील गाणी लोकप्रिय झाली. त्यामुळे 'राज कपूर यांचा आवाज' अशी मुकेश यांची ओळख निर्माण झाली.

मुकेश यांच्या आवाजाची खासियत म्हणजे त्यातील नैसर्गिक भावुकता. त्यांच्या आवाजात कृत्रिमता नव्हती. प्रेम, विरह, दुःख, एकाकीपणा, आशा आणि जीवनातील संघर्ष या भावना ते अत्यंत सहजतेने व्यक्त करीत. त्यामुळे त्यांचे गीत ऐकताना ते केवळ गाणे ऐकत असल्याची भावना होत नसे, तर एखादी हृदयस्पर्शी कथा आपल्या मनासमोर उलगडत असल्याचा अनुभव येत असे.

मुकेश यांनी हिंदी चित्रपटसंगीताला असंख्य अविस्मरणीय गीते दिली. 'दोस्त दोस्त ना रहा', 'जीना यहाँ मरना यहाँ', 'कहीं दूर जब दिन ढल जाए', 'मैं पल दो पल का शायर हूँ' यांसारख्या त्यांच्या गीतांनी अनेक पिढ्यांच्या मनावर राज्य केले. त्यांच्या स्वरांमध्ये जीवनातील वेदना व्यक्त करण्याची विलक्षण ताकद होती. म्हणूनच त्यांना 'दर्दभरा आवाज' अशी ओळख मिळाली.

१९७६ मध्ये राज कपूर यांच्या 'सत्यम शिवम सुंदरम' या चित्रपटासाठी गाण्याचे ध्वनिमुद्रण करून मुकेश अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते. २७ ऑगस्ट १९७६ रोजी अमेरिकेतील डेट्रॉईट येथे त्यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच राज कपूर यांनी, ह्आज माझा आवाज कायमचा हरपला,ह्व अशी हृदयस्पर्शी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांच्या निधनाने हिंदी चित्रपटसृष्टीने एक महान पार्श्वगायक गमावला.

मुकेश यांना त्यांच्या कारकिर्दीत अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. 'रजनीगंधा' चित्रपटातील 'कई बार यूँ ही देखा है' या गीतासाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. तसेच त्यांना चार वेळा फिल्मफेअर पुरस्काराने गौरविण्यात आले. मात्र पुरस्कारांपेक्षाही आपल्या चाहत्यांच्या हृदयात मिळालेले स्थान हेच त्यांच्या कलेचे खरे यश होते.

मुकेश यांचा आवाज हा केवळ एक स्वर नव्हता; तो भावनांचा स्पर्श होता. त्यांच्या गाण्यांमधून व्यक्त होणारा दर्द, प्रेम आणि जीवनाचे तत्त्वज्ञान आजही रसिकांना अंतर्मुख करते. काळ बदलला, संगीताच्या शैली बदलल्या, तंत्रज्ञान बदलले; परंतु मुकेश यांच्या स्वरांची मोहिनी मात्र आजही कायम आहे.

काही गायक काळाच्या ओघात विस्मृतीत जातात; पण काही स्वर काळावर मात करून अजरामर होतात. मुकेश हे अशाच अजरामर स्वरांचे गायक होते. त्यांच्या आवाजात भारतीय मनातील सुख-दुःख, प्रेम-विरह आणि जीवनातील असंख्य भावनांचे प्रतिबिंब उमटले होते. म्हणूनच मुकेश आज आपल्यात नसले तरी त्यांचा आवाज प्रत्येक पिढीला पुन्हा पुन्हा आपलासा वाटतो.

अजरामर स्वरांना मृत्यू नसतो; ते गीतांच्या रूपाने सदैव जिवंत राहतात.

स्मृतिदिनी या महान, अजरामर पार्श्वगायक मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!



**श्याम ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे,
9922546295

# शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या दुसरा हप्ता जारी

## ६,३६,०३६ पात्र शेतकऱ्यांना ₹ ५,०८६ कोटी वितरीत



**मुंबई, (कटूसत्य वृत्त)**:- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील ६,३६,०३६ पात्र शेतकऱ्यांना ५,०८६ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट ऑनलाइन पद्धतीने वितरित करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या योजनेच्या अंमलबजावणीअंतर्गत आतापर्यंत १२,५८,२४३ शेतकऱ्यांना एकूण १०,११५ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला आहे. पात्र शेतकऱ्यांना लाभ वितरणाची प्रक्रिया सुरू असून, लाभार्थींची संख्या सातत्याने अद्ययावत होत आहे. आतापर्यंत १३.७० लाख कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील लाभ वितरण ऑनलाइन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मंत्रिमंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी आणि सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते.

**दुसऱ्या टप्प्यात विभागनिहाय लाभ**

अमरावती विभाग : १ लाख ४५ हजार ८०८ शेतकऱ्यांना १,२०८ कोटींचा लाभ.

नाशिक विभाग : ८४ हजार ८१३ शेतकऱ्यांना ७५६ कोटींचा लाभ.

छत्रपती संभाजीनगर विभाग : ३ लाख २ हजार २७३ शेतकऱ्यांना २,२८४ कोटींचा लाभ.

पुणे विभाग : ४९ हजार २२४ शेतकऱ्यांना ४१७ कोटींचा लाभ.

नागपूर विभाग : ४४ हजार ८६४ शेतकऱ्यांना ३६६ कोटींचा लाभ.

कोकण विभाग : ९ हजार ५४ शेतकऱ्यांना ५४ कोटींचा लाभ.

योजनेची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत असून, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या नियंत्रणाखाली या प्रक्रियेचे व्यवस्थापन केले जात आहे.

# राज्यस्तरीय स्पर्धेसाठी नोंदणीकृत व परवानाधारक मंडळांनी सहभागी व्हावे

## जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत धमार्दाय आयुक्तांकडे नोंदणीकृत संस्था तसेच संबंधित यंत्रणेकडून परवानाधारक असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येणार आहे.

**100 गुणांच्या आधारे मूल्यांकन**

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड विविध निकषांच्या आधारे करण्यात येणार

असून, एकूण 100 गुणांचे मूल्यांकन केले जाणार आहे. त्यामध्ये –

1. कलांचे जतन व संवर्धन – 20 गुण
2. संस्कृतीचे जतन व संवर्धन – 20 गुण
3. निसर्गाचे व सार्वजनिक संपत्तीचे जतन व संवर्धन – 20 गुण
4. सामाजिक कार्य – 20 गुण
5. गणेशोत्सव आयोजनातील विधायकता – 20 गुण

असे प्रत्येक निकषासाठी 20 गुण निर्धारित करण्यात आले आहेत.

जिल्हास्तरीय निवड समिती गठीत स्पर्धेतील विजेत्यांची निवड करण्यासाठी जिल्हास्तरावर निवड समिती गठीत करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी दजार्चा अधिकारी* या समितीचे अध्यक्ष असतील. शासकीय कला महाविद्यालयातील कला प्राध्यापक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आणि जिल्ह्यातील पोलीस अधिकारी हे सदस्य असतील. जिल्हा नियोजन अधिकारी हे सदस्य सचिव असतील. तसेच प्रयोगात्मक कला क्षेत्रातील एक आणि दृश्यकला क्षेत्रातील एक अशा दोन कलाकारांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

तालुकास्तरीय समितीद्वारेही मूल्यांकन तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत मुख्याधिकारी, महानगरपालिकेचे संबंधित वॉर्ड अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागातील विद्युत/स्थापत्य उपअभियंता आणि पोलीस निरीक्षक अथवा संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांचा सदस्य म्हणून

समावेश आहे.तसेच संबंधित तालुक्यातील प्रयोगात्मक कला व दृश्यकला क्षेत्रातील प्रत्येकी एक अशा दोन कलाकारांची अशासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

**ऑनलाइन अर्ज**

या स्पर्धेचे समन्वयक म्हणून संचालक, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी काम पाहणार आहेत. स्पर्धेत केवळ नोंदणीकृत संस्था अथवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनाच सहभागी होता येईल. पात्र मंडळांनी अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या *ल्लीरँङ्ग३२५.स्र'ँ.ङ्क.ल्ल* या पोर्टलद्वारे विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. जिल्हा, राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर गणेशोत्सवाचे आयोजन करणाऱ्या पात्र सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी होऊन कला, संस्कृती, पर्यावरण संवर्धन, सामाजिक कार्य आणि विधायक उपक्रमांच्या माध्यमातून आपले योगदान अधोरेखित करावे, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा नियोजन समिती, सोलापूरचे दिलीप पवार यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

## वात्रटिका

### सगळे व्यस्त आहेत

प्रत्येकाचा आटापिटा आणि
प्रत्येकजण मस्त आहे...
जणू काही काम दिले वाटून
तिथे प्रत्येकजण व्यस्त आहे...
कोण फोडाफोडी करतो,कोण
फक्त बडबड तर कोण टाकी डाव..
कोणा वाटते मीच फक्त शहाणा
दोन तुकडे करतो टाकून एक घाव...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# विडी कामगारांचा रोजगार आणि उद्योग टिकवण्यासाठी तोडगा काढणार - आ.सुभाष देशमुख

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील विडी कामगार भगिनी तसेच विडी कारखानदारांची भेट घेऊन मजुरी दराबाबत निर्माण झालेल्या परिस्थितीची आमदार सुभाष देशमुख यांनी सविस्तर माहिती घेतली. कामगारांचा रोजगार टिकून राहावा आणि विडी कारखानेही सुरू राहावेत, यासाठी शासनस्तरावर योग्य तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



सध्या महाराष्ट्रात दर हजार विड्यांसाठी ₹२४५ मजुरी दिली जात आहे. महाराष्ट्र शासनाने हा दर वाढवून ₹३७९.८० करण्याचा निर्णय घेतल्याने कामगार संघटना आणि विडी कारखानदार यांच्यामध्ये मजुरी वाढीच्या प्रश्नावर मतभेद निर्माण झाले आहेत.

मात्र, प्रत्यक्ष विडी कामगार भगिनींशी चर्चा केल्यानंतर कामगार आणि कारखानदार यांची या प्रश्नावरील भूमिका काही अंशी समान असल्याचे स्पष्ट झाले, असे आमदार देशमुख यांनी सांगितले. कारखाने बंद पडू नयेत, रोजगार सुरू राहावा आणि कुटुंबांचा उदरनिर्वाह सुरक्षित राहावा, अशी कामगारांची भूमिका आहे. सध्या मिळणाऱ्या ₹२४५ मजुरीमध्ये काम करण्यास तयार असल्याचे काही कामगारांनी सांगितले. मजुरीमध्ये मोठी वाढ झाल्याने कारखाने बंद पडले किंवा इतर राज्यांत स्थलांतरित झाले, तर त्याचा थेट परिणाम आपल्या रोजगारावर होईल, अशी भीतीही कामगारांनी व्यक्त केली.

दुसरीकडे, विडी कारखानदारांनीही आपल्या अडचणी आमदार देशमुख यांच्यासमोर मांडल्या. उत्पादन खर्चामध्ये मजुरीचा मोठा वाटा असल्याने मजुरीमध्ये मोठी वाढ झाल्यास विडीची उत्पादन किंमत वाढेल. त्यामुळे इतर राज्यांतील तुलनेने स्वस्त विड्यांशी बाजारपेठेत स्पर्धा करणे कठीण होईल आणि त्याचा परिणाम उद्योगावर होण्याची शक्यता कारखानदारांनी व्यक्त केली.

कारखानदारांच्या म्हणण्यानुसार, तेलंगणा राज्यातील त्यांच्या कारखान्यांमध्ये दर हजार विड्यांसाठी सुमारे ₹२३८ मजुरी दिली जाते. महाराष्ट्रात सध्या ₹२४५ मजुरी असल्याने येथील दर तेलंगणापेक्षा अधिक आहे. अशा परिस्थितीत ₹३७९.८० दर लागू झाल्यास उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढून महाराष्ट्रातील विडी उद्योगाच्या स्पर्धात्मकतेवर परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

कामगारांना रोजगार टिकवायचा आहे आणि कारखानदारांना कारखाने सुरू ठेवायचे आहेत. त्यामुळे दोघांचेही अंतिम उद्दिष्ट एकच आहे, असे आमदार देशमुख यांनी स्पष्ट केले.

आजच्या चर्चेतून हा प्रश्न केवळ मजुरी वाढीपुरता मर्यादित नसून हजारो कामगारांचा रोजगार, कारखान्यांचे अस्तित्व आणि सोलापूरच्या विडी उद्योगाच्या भवितव्याशी संबंधित असल्याचे स्पष्ट झाले आहे, असेही त्यांनी सांगितले.

कामगार संघटनांनी कामगारांच्या हितासाठी मजुरी वाढीसाठी शासनाकडे पाठपुरावा केला आहे. त्यांच्या भूमिकेचाही आदर आहे. मात्र, प्रत्यक्ष कामगार आणि कारखानदारांच्या भूमिका समोर आल्यानंतर कामगारांचा रोजगार आणि उद्योगाचे अस्तित्व या दोन्हींचा समतोल साधणे आवश्यक आहे, असे देशमुख म्हणाले.

याबाबत संबंधित विडी कारखानदार, कामगार प्रतिनिधी आणि संघटनांशी पुढील चर्चा करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच संबंधित मंत्र्यांची भेट घेण्यात येणार आहे. हा संपूर्ण विषय शासनाच्या निदर्शनास आणून देऊन कामगारांचा रोजगार टिकावा आणि कारखानेही सुरू राहावेत, यासाठी योग्य तोडगा काढण्याची विनंती करण्यात येईल.

कामगारांचा रोजगार टिकला पाहिजे, कारखाने बंद पडता कामा नयेत आणि सोलापूरचा विडी उद्योगही टिकला पाहिजे— या भूमिकेतून योग्य तोडगा काढण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार आहोत, असे आमदार सुभाष देशमुख यांनी सांगितले.

# तेजस्विनीच्या वैज्ञानिक प्रयोगाला मिळाली शाबासकीची थाप; विज्ञान प्रेरणा पुरस्काराने गौरव

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** नवभारत इंग्लिश स्कूल येथील आयोजित विज्ञान प्रदर्शनात सादर केलेल्या प्रयोगाबद्दल स्कूलची विद्यार्थिनी कु. तेजस्विनी विशाल परदेशी हिला मान्यवरांच्या हस्ते 'पद्मश्री डॉ. अरविंद गुप्ता विज्ञान प्रेरणा पारितोषिक' प्रदान करण्यात आला. करमाळा येथील यशकल्याणी सेवा भवनच्या सभागृहात हा पुरस्कार सोहळा पार पडला.




रविवार दि. २३ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता करमाळा शहरातील पुणे रोड येथील यशकल्याणी सेवाभवन येथे यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्था (पुणे) यांच्या वतीने 'पद्मश्री डॉ. अरविंद गुप्ता विज्ञान प्रेरणा पारितोषिक' आणि 'केतकी हिम्मतराव शिंदे समाजदीप पुरस्कार २०२६' वितरण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी श्री स्वामी समर्थ देवस्थान, अक्कलकोटचे विश्वस्त संपतराव (भारतभाऊ) शिंदे पाटील यांच्या हस्ते आणि सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ व मायक्रोबायोलॉजिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे संस्थापक-अध्यक्ष मा. डॉ. अरविंद देशमुख, यश कल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रा. गणेश करे पाटील, ग्लॅमोवेल वेलनेस प्रा.लि. पुणे च्या संस्थापक संचालिका डॉ. प्रचिती पुंडे, उद्योजक हिम्मतराव शिंदे आणि वीरमाता सौ. अनुजाताई अरविंद निलंगे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या सोहळ्यात कु. तेजस्विनीने नवभारत इंग्लिश स्कूल मध्ये सादर केलेल्या अँटी थेफ्ट अलार्म या प्रयोगाबद्दल 'पद्मश्री डॉ. अरविंद गुप्ता विज्ञान प्रेरणा पारितोषिक' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कु. तेजस्विनी हिने नवभारत इंग्लिश स्कूल येथे आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शनात घरातील टाकाऊ वस्तु आणि वडील विशाल परदेशी यांच्या फर्निचर व्यवसायातील शिल्लक पडलेल्या साहित्यातून कॉलनी किंवा वसाहतीत होणाऱ्या चोऱ्या किंवा आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी पडू शकणाऱ्या 'अँटीथेप्ट अलार्म सिस्टीम' हा प्रयोग सादर केला होता. विद्यार्थ्यांच्या विज्ञाननिष्ठ जिज्ञासेला प्रेरणा देण्याच्या हेतूने यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्थेचे संस्थापक प्रा. गणेश करे पाटील यांनी या विज्ञान प्रदर्शनाला भेट देत कु. तेजस्विनी हिच्या कल्पकतेला दाद देत तिची या पुरस्कारासाठी निवड केली होती.

यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्था (पुणे) यांच्या वतीने 'पद्मश्री डॉ. अरविंद गुप्ता विज्ञान प्रेरणा पारितोषिक' मिळाल्याबद्दल कु. तेजस्विनी परदेशी हीचे नवभारत इंग्लिश स्कूलच्या संचालिका सौ. सुनिता देवी, मुख्याध्यापिका सौ. अश्विनी क्षीरसागर, पी.एम. श्री. साधना बाई नामदेवराव जगताप न. पा. मुलींची शाळा नं. १ चे मुख्याध्यापक दयानंद चौधरी आणि सर्व शिक्षक वृंदा कडून अभिनंदन करण्यात आले. यासोबतच कु. तेजस्विनी हीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# अक्कलकोट तालुक्यातील खरीप पिके धोक्यात; पावसाच्या खंडाने शेतकऱ्यांची चिंता वाढली

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त) :-** तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीला झालेल्या समाधानकारक पावसामुळे पिकांची उगवण चांगली झाली असली, तरी त्यानंतर पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. तालुक्यातील अनेक भागांत पावसाचा खंड पडल्याने सोयाबीन, तूर, उडीद, मूग, भुईमूग, सूर्यफूल आणि चवळी या प्रमुख खरीप पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

यंदा अक्कलकोट तालुक्यात हजारो हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी करण्यात आली आहे. तूर, उडीद आणि सोयाबीनचा पेरणीमध्ये मोठा वाटा असून, अपेक्षित उत्पन्नाच्या दृष्टीने अनेक शेतकऱ्यांनी या पिकांवर मोठी भिस्त ठेवली आहे. मात्र, पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडण्याची भीती निर्माण झाली आहे.



**रोग-किडींच्या प्रादुर्भावाचीही शक्यता**

पावसातील अनिश्चिततेमुळे पिकांवर विविध रोग व किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यताही व्यक्त होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकांची नियमित पाहणी करावी. कोणत्याही रोग-किडीची लक्षणे आढळल्यास कृषी विभागाच्या मार्गदर्शनानुसारच कीडनाशके व बुरशीनाशकांची फवारणी करावी, असे आवाहन कृषी क्षेत्रातील जाणकारांनी केले आहे.

**कृषी विभागाकडून मार्गदर्शन**

यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन व तुरीच्या उत्पादनवाढीसाठी कृषी कार्यालयाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन तसेच विविध प्रात्यक्षिके राबविली जात आहेत. मात्र, हवामानातील वाढती अनिश्चितता ही खरीप हंगामासाठी मोठी जोखीम ठरत आहे. त्यामुळे आगामी काळात पावसाने साथ दिली नाही, तर उत्पादनावर त्याचा थेट परिणाम होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

सध्या सोयाबीनसह विविध पिके वाढीच्या, फुलोऱ्याच्या आणि शेंगा भरण्याच्या महत्त्वाच्या अवस्थेत आहेत. या काळात पुरेसा पाऊस न झाल्यास जमिनीतील ओलावा कमी होऊन पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. विशेषतः कोरडवाहू क्षेत्रातील शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. सोयाबीनला फुलोरा व शेंगा भरण्याच्या काळात पाण्याचा ताण बसल्यास दाणे भरण्यावर परिणाम होऊन उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. तुरीलाही पाण्याच्या ताणाचा फटका बसण्याची शक्यता असून सूर्यफूल व इतर पिकांनाही संतुलित पावसाची आवश्यकता आहे. तालुक्यातील काही भागांत पिके जोमाने वाढत असतानाच काही ठिकाणी पावसाअभावी जमिनीतील ओलावा कमी होत असल्याचे चित्र आहे. दुसरीकडे पावसाचा मोठा खंड पडून अचानक जोरदार पाऊस झाल्यासही पिकांना नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी पावसाचे सातत्य आणि योग्य प्रमाण अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे.

# दक्षिण सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये 'स्पोकन इंग्लिश' उपक्रमास प्रारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांचा इंग्रजी भाषेतील आत्मविश्वास वाढवून त्यांना दैनंदिन जीवनात सहजपणे इंग्रजी संभाषण करता यावे, या उद्देशाने दक्षिण सोलापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी मांडलेल्या अभिनव उपक्रमाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी कौतुक केले.



मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निजी कक्षात झालेल्या बैठकीत या उपक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी सनी चव्हाण तसेच दक्षिण सोलापूर गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार, शिक्षण विस्तार अधिकारी गुरुबाळ सनके, मल्लिनाथ स्वामी तसेच निवडक इंग्रजी शिक्षक उपस्थित होते.

या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकापुरते इंग्रजी शिक्षण न देता प्रत्यक्ष व्यवहारात इंग्रजीचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यावर भर देण्यात आला आहे. परिपाठामध्ये इंग्रजी भाषेत भाषण, सुविचार, बातमी वाचन, संवाद सादरीकरण यांसारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यात येणार आहे.

शाळांमध्ये इंग्रजी वर्तमानपत्र वाचन, इंग्रजी फलक लेखन, दररोज मराठीसोबत इंग्रजी सुविचार लेखन तसेच विद्यार्थ्यांमध्ये दैनंदिन इंग्रजी संभाषणाची सवय निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढण्यासोबतच इंग्रजी बोलण्याची भीती दूर होऊन आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमातील विशेष संकल्पना म्हणजे 'इंग्रजी स्टार रेटिंग'. शाळेतील किती टक्के विद्यार्थी इंग्रजीमध्ये सहज संवाद साधू शकतात, याच्या आधारे शाळांना One Star ते Five Star अशी श्रेणी देण्याची संकल्पना आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांचा गौरव करण्यात येणार आहे.

'हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेचा आत्मविश्वास निर्माण करणारा असून अत्यंत प्रेरणादायी आहे. प्रथम दक्षिण सोलापूर तालुक्यात प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम राबवावा. त्याचे सकारात्मक परिणाम आणि अनुभव लक्षात घेऊन पुढील टप्प्यात संपूर्ण जिल्ह्यात या उपक्रमासाठी मार्गदर्शन करण्यात यावे,' असे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी सांगितले.

# मोहोळमध्ये गणेशोत्सवात सीसीटीव्हीची नजर

**१,४०० ग्रामसुरक्षा दलातील युवक सज्ज**





**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोहोळ शहर व तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी मोहोळ पोलिसांनी व्यापक तयारी सुरू केली आहे. गणेशोत्सव काळात गर्दीच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर राहणार असून, सुरक्षेसाठी ग्रामसुरक्षा दलातील सुमारे १ हजार ४०० युवकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. गणेशोत्सव शांततेत व निर्भय वातावरणात पार पडावा, यासाठी पोलिसांकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

मोहोळ शहरातील इंदिरा कन्या प्रशाला, गरड महाविद्यालय, बसस्थानक, दत्तनगर, छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि सोलापूर चौक या महत्त्वाच्या व गर्दीच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे उत्सवादरम्यान होणाऱ्या हालचालींवर पोलिसांची विशेष नजर राहणार आहे.

गणेशोत्सव काळात वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाहीही सुरू करण्यात आली आहे. मोहोळ बसस्थानक परिसर तसेच कुरुल रोड परिसरातील अतिक्रमणे हटविण्यात आली आहेत.

ग्रामसुरक्षा दलातील युवकांना गणेशोत्सव काळातील कर्तव्याबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात येत असून, त्यांना आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. या युवकांना काठ्या, शिट्ट्या तसेच टी-शर्ट देण्यात येणार आहेत. गर्दीचे नियोजन, नागरिकांना मदत करणे आणि पोलिसांना आवश्यक सहकार्य करणे याबाबत त्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

दरम्यान, मोहोळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत सात बीट असून, प्रत्येक बीटच्या अंमलदारांकडून आपल्या कार्यक्षेत्रातील शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना सोशल मीडिया, सायबर क्राईम आणि इतर महत्त्वाच्या विषयांबाबत मार्गदर्शन करण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

गणेशोत्सव मंडळांनी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी आखून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच उत्सव काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी केले आहे.


## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**


सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) देशाचे संरक्षणमंत्री २) देशाचे रस्ते वाहतूक व बांधकाम मंत्री- नितीन **** ३) भीती (हिंदीत) ४) मच्छीमारी करून उदरनिर्वाह करणारा वर्ग ५) नदीवर बांधलेला साकव, ब्रीज ६) पुष्कळ, भरमसाठ ७) सावकाश मंद गतीने चालणारा एक छोटा प्राणीजीव ९) श्रवणेंद्रिय ११) एक माजी मंत्री-***** पाचपुते १६) दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा १७) भारताचा माजी कर्णधार व सध्या बीसीसीआय अध्यक्ष - सौरभ *** २०) ब्रेड, केक इत्यादी पदार्थ जेथे बनविले जातात ती जागा २२) शर्ट (ग्रामीण भाषेत) २३) पाकचे माजी पंतप्रधान २७) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना २९) दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री-** दीक्षित ३०) लष्करातील सैनिकाला शौर्याबद्दल दिले जाणारे मेडल- ***** चक्र ३१) वाळवंट प्रदेश असलेले भारतातील राज्य ३२) लायब्ररी (मराठीत) ३३) चार गुणिले चार ३६) सातारा जिल्ह्यातील फुलांसाठी जगप्रसिध्द असलेले पठार ३९) जरचा साथीदार ४१) कौशल्य ४३) एखाद्या गोष्टीचा घेतलेला ध्यास ४४) ख्रिश्चन धर्मसेविका ४५) टिकून राहणे, गत उलट लिहा

**आडवे शब्द :** १) खा. सुनील तटकरे यांचा लोकसभा मतदारसंघ ४) जोतिबा, अंबाबाई देवस्थान पश्चिम महाराष्ट्रातील या जिल्ह्यात आहे ७) या राज्याची राजधानी पणजी आहे ८) सिंहाचे जोराचे ओरडणे १०) धांदल, घाई १२) अनिल कपूर अभिनीत एक राजकारणावर आधारित चित्रपट १३) उन्हाळ्यातील एक महिना १४) दुप्पट (इंग्रजीत) १५) कागदाचे वीस दस्त्यांचे माप, सायकलचे चाक १६/अ) श्रीगणेशाचा एक मंत्र-* गं गणपतये नम: १८) मोठा ढोल १९) दमयंती पती २०) बिहारमधील मंत्री गिरीराजसिंह यांचा लोकसभा मतदारसंघ २१) विनाकारण, नाहक २३) बनावट २८) विठ्ठल भक्तांचे पंढरीला पायी जाणे ३०) मार्ग, रस्ता ३१) राजाचे भव्य निवासस्थान ३३) सुशीलकुमार शिंदे यांचा लोकसभा मतदारसंघ ३४) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा ** ३५) याचे कणीस भाजून खातात ३७) श्वसनेंद्रिय ३८) चालरूढ, पध्दत ४०) सात गुणिले तीन ४२) आश्चर्य ४४) तिरस्कार (हिंदीत) ४६) शिक्षकांना या नावाने संबोधतात ४७) पोलीस दलाच्या वाहनांच्या येण्याची सूचना करण्यासाठी मोठा आवाज करणारे लावतात ते ४८) श्रीमंतच्या विरूध्दार्थी शब्द ४९) मोफत (इंग्रजीत)

## सुडोकु - 40

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 7 | 8 | 6 | 2 | 9 | 4 | | 5 |
| | | 9 | | | 1 | 7 | 6 | |
| | | | | 4 | | | | 8 |
| | | | 1 | 8 | | | 9 | |
| | | 2 | | | 4 | | 5 | 7 |
| | | 6 | 5 | 3 | 7 | 2 | | |
| | 1 | | 2 | | | 5 | | |
| | 5 | 7 | | | | | | 1 |
| 9 | | 4 | 3 | 1 | | 6 | 7 | |

# विडी उद्योग जिल्ह्याबाहेर स्थलांतर होणार नाहीत/बंद होणार नाहीत

## विडी उद्योग मालकांचा सकारात्मक प्रतिसाद




**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात विडी कामगारांना, शासन परिपत्रकान्वये किमान वेतन देणे बाबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, अप्पर कामगार आयुक्त पुणे विभाग अभय गीते, सहाय्यक कामगार आयुक्त मंगेश झोले, सरकारी कामगार अधिकारी जयदीप मगर तसेच विविध विडी कारखानदार मालक उपस्थित होते. किमान वेतन अंमलबजावणीच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले की, किमान वेतन अंमलबजावणी करताना उद्भवणाऱ्या समस्यांबाबत उद्योजकांनी आपले म्हणणे लेखी निवेदनाद्वारे सादर करावे. तसेच कामगार संघटनांकडून त्यांच्या मागण्या/निवेदने घेतली जातील. दोन्ही पक्षांची बाजू शासन दरबारी योग्यरित्या मांडण्यात येईल, असे सांगण्यात आले.

दरम्यान अपर कामगार आयुक्त पुणे विभाग अभय गीते यांनी प्रकरण योग्य मार्गाने व सकारात्मक दृष्टीने सोडवण्यासाठी उद्योजकांना मार्गदर्शन केले. तसेच यावेळी विडी कारखानदारांच्या अडीअडचणी ऐकून घेण्यात आल्या. तसेच किमान वेतन बाबत वेळोवेळी प्राप्त शासन निदेर्शान्वये प्रभावी अंमलबजावणी करण्यास प्रशासन कटिबद्ध असल्याचे, सोलापूर जिल्हा सहाय्यक कामगार आयुक्त मंगेश झोले यांनी प्रतिपादन केले.

आजच्या बैठकीत झालेल्या चचेर्नंतर, सोलापूर येथील कोणताही विडी उद्योग स्थलांतरित होणार नाही किंवा बंद होणार नाही, याबाबत मालक वर्ग सकारात्मक दृष्टीने विचार करत आहे. असे बैठकीस उपस्थित विडी उद्योजक मालक यांचेकडून सांगण्यात आले. कामगारांनी याबाबत इतर कोणत्याही अफवांवरती विश्वास ठेऊ नये, असेही त्यांनी प्रतिपादन केले.

# नेपाळमध्ये अडकलेल्या सोलापूर जिल्ह्यातील पर्यटकांनी आपत्कालीन कार्यकेंद्राशी संपर्क साधावा- जिल्हाधिकारी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर विविध देशांतील पर्यटक व नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील जे पर्यटक सध्या नेपाळमध्ये असून पूरस्थितीमुळे अडकले आहेत किंवा ज्यांचा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क होत नाही, त्यांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी तात्काळ जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

**यासाठी खालील क्रमांकांवर संपर्क साधता येईल :**

जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, सोलापूर 0217-2731012 नेपाळमध्ये अडकलेल्या पर्यटकांची माहिती प्रशासनाला देताना संबंधित व्यक्तीचे नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण/हॉटेल, प्रवासाचा तपशील आणि कुटुंबीयांचा संपर्क क्रमांक उपलब्ध असल्यास तो द्यावा. सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून न जाता अधिकृत माहितीसाठी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा.

आपत्तीग्रस्त भागातील नागरिक व पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती माहिती व समन्वय साधण्याचे प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात येत आहेत. तसेच पर्यटकांची माहिती महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई कडे नोंदविणेसाठी लिंक खालीलप्रमाणे आहे.

https://geospatial.mahaseoc.in/Sahayata_gulf/

# विद्यार्थ्यांच्या आरोग्याची जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून पाहणी

## मार्डी, बानेगावच्या जिल्हा परिषद शाळांना भेट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या सूचनेनुसार आणि आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. भगवान पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या नियमित आरोग्य तपासणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांनी मार्डी व बानेगाव येथील जिल्हा परिषद शाळांना नुकतीच भेट देऊन पाहणी केली. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ६ ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची वैद्यकीय पथकांमार्फत नियमित आरोग्य तपासणी केली जाते. ही तपासणी वेळेत होत आहे का, विद्यार्थ्यांना आवश्यक आरोग्य सेवा मिळत आहेत का, तसेच तपासणीदरम्यान आढळणाऱ्या आजारांवर योग्य उपचार व संदर्भ सेवा दिली जात आहे का, याचा प्रत्यक्ष आढावा डॉ. कोपुरवाड यांनी घेतला. आरोग्य तपासणीत काही समस्या आढळल्यास विद्यार्थ्यांना तात्काळ उपचार व आवश्यक संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी आरोग्य पथकांना दिल्या.

यावेळी कुष्ठरोग विभागाचे सहसंचालक डॉ. मोहन शेगर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. "आम्हीही जिल्हा परिषद शाळेतच शिक्षण घेतले आहे. परिस्थिती कशीही असली तरी जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर विद्यार्थ्यांनी मोठी ध्येये गाठावीत," असा प्रेरणादायी संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

### आरोग्यदायी जीवनशैलीवर भर

विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता, परिसराची स्वच्छता, संतुलित आहार, योगासने आणि मैदानी खेळांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तसेच मोबाईल व टीव्हीच्या अतिवापरामुळे होणाऱ्या शारीरिक व मानसिक दुष्परिणामांची माहिती देत विद्यार्थ्यांना 'डिजिटल डिटॉक्स' करण्याचा सल्ला देण्यात आला.

### अति जोखमीच्या गर्भवतीची गृहभेट

मार्डी येथे एका अति जोखमीच्या (High-Risk) गर्भवती मातेच्या घरीही आरोग्य पथकाने भेट देऊन तिच्या आरोग्याची विचारपूस केली. संबंधित महिलेच्या आरोग्यावर विशेष लक्ष ठेवून नियमित देखरेख करण्याच्या सूचना आरोग्य कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या.

या पाहणी दौऱ्यावेळी जिल्हा समन्वयक प्रदीप नामदे, संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# 'मीडिया मास्टर' नव्या पत्रकारांना दिशा देईल- महापौर कोंड्याल

## पत्रकार किरण बनसोडे लिखित 'मीडिया मास्टर' पुस्तकाचे प्रकाशन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पत्रकारिता ही लोकशाहीचा आरसा असून पत्रकारांनी निर्भीडपणे, प्रामाणिकपणे आणि वस्तुनिष्ठपणे समाजातील प्रश्न मांडले पाहिजेत. प्रशासनातील त्रुटी असोत अथवा नागरिकांच्या समस्या, त्या कोणताही मुलाहिजा न ठेवता लोकांसमोर आणण्याचे काम पत्रकारांनी करणे गरजेचे आहे. प्रामाणिकपणे काम केले, तर जीवनात यश नक्की मिळते. 'मीडिया मास्टर' नव्या पत्रकारांना दिशा देईल, असे प्रतिपादन महापौर विनायक कोंड्याल यांनी केले.

पत्रकार किरण बनसोडे लिखित जागृती पब्लिकेशन प्रकाशित 'मीडिया मास्टर'या पुस्तकाचे प्रकाशन महापौर कोंड्याल यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात हा कार्यक्रम पार पडला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव प्रा. डॉ. शिवाजीराव शिंदे, मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने, ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड, बहुजन शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, दैनिक तरुण भारतचे समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश कोरे , श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, पत्रकार विजय गायकवाड, प्रकाशक सोमनाथ गायकवाड, लीना बनसोडे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मध्यम साक्षरता चळवळीत योगदान देणारे

प्रा. डॉ. अंबादास भास्के आणि विजय लोंढे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कोंड्याल पुढे म्हणाले, किरण बनसोडे यांनी पत्रकारितेतील २४ वर्षांचा अनुभव 'मीडिया मास्टर' च्या माध्यमातून नव्या पिढीसमोर मांडला आहे. यूट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्राम आदी सोशल मीडिया माध्यमातून अनेकजण पत्रकारितेत येत आहेत. मात्र समाजात नेमके काय घडत आहे, याची वस्तुनिष्ठ माहिती लोकांसमोर मांडणारे आणि सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे पत्रकार घडणे आवश्यक आहे. या दृष्टीने हे पुस्तक महत्त्वाचे आहे. नव्या पिढीतील पत्रकारांसाठी आदर्श निर्माण करणारे हे पुस्तक असल्याचेही महापौर कोंड्याल यांनी सांगितले.

सहकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि कुटुंबाच्या भक्कम पाठिंब्यामुळेच आज हा 'सोन्याचा दिवस' पाहायला मिळाल्याचे भावूक मनोगत लेखक किरण बनसोडे यांनी व्यक्त केले.प्रास्ताविक व आभार प्रदर्शन पत्रकार विजय गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन अश्विनी तडवळकर यांनी केले. यावेळी भालचंद्र साखरे, श्रावण भंडारे, डॉ. हिराकांत जाधव, समाधान जाधव यांच्यासह पत्रकारिता, शिक्षण, प्रशासन, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मॉडेल विविधांगी प्रशालेत विद्यार्थ्यांनी घेतली नशामुक्तीची शपथ



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** दि मॉडेल विविधांगी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, माळीनगर येथे भारत सरकारच्या नशामुक्ती अभियानांतर्गत ब्रह्माकुमारी संस्थेच्या अकलूज सेंटरच्या संचालिका ब्रह्मकुमारी शिवराजी बहनजी सहयोगाने विद्यार्थ्यासाठी नशामुक्ती जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी विद्यालयातील सुमारे १८०० विद्यार्थ्यांनी नशामुक्तीची शपथ घेत व्यसनांपासून दूर राहण्याचा संकल्प केला. 'व्यसनमुक्त अभियान व मूल्यवान जीवन' या विषयावर बहनजी म्हणाल्या की, मनाची एकाग्रता करण्यासाठीच मेडिटेशन केले पाहिजे.आपले विचार शक्तीशाली सकारात्मक कसे करायचे ही प्रात्यक्षित दाखवले व्यसनांचे शरीर, मन, कुटुंब आणि समाजावर होणारे दुष्परिणाम स्पष्ट करत निरोगी, आनंदी व मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी आजपासूनच व्यसनांना नकार देत आपल्या मित्र-परिवारातही व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. भारत सरकार आणि ब्रह्माकुमारी संस्थेच्या सहयोगातून राबविण्यात येणाऱ्या नशामुक्ती अभियानाच्या माध्यमातून युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागृती निर्माण करण्याबरोबरच त्यांना सकारात्मक आणि मूल्यवान जीवनाची दिशा देण्याचे कार्य केले जात आहे. अनगर विद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या अभियानाला निश्चितच बळ देणारा ठरला. या कार्यक्रमास ब्रह्माकुमारी परिवारातिल नरेंद्रभाई घाडगे, प्रतापभाई राऊत, सतीश झगडे,जयश्री झगडे, छाया यादव, प्राचार्य कलाप्पा बिराजदार, उपप्राचार्य रितेश पांढरे, पर्यवेक्षक सुनील जवरे व शिक्षक,शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन आतकर यांनी केले.

# सह्याद्री फाउंडेशनचा 'एक राखी सैनिक बांधवांसाठी' उपक्रम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सह्याद्री फाउंडेशनतर्फे रक्षाबंधनाच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या 'एक राखी सैनिक बांधवांसाठी' या उपक्रमाला सोलापूर परिसरातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थिनींनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या राख्या सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिक बांधवांसाठी पाठविण्यात आल्या.

विशेष म्हणजे, सह्याद्री फाउंडेशनतर्फे गेल्या पाच वर्षांपासून दरवर्षी सातत्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाला दरवर्षी विद्यार्थिनी व शाळांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, वर्षागणिक सहभाग वाढत आहे. यंदाही विविध शाळांतील विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने राख्या तयार करून सैनिक बांधवांप्रती आपले प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली.

या उपक्रमात जि.प. मुलींची शाळा कुंभारी, जि.प. शाळा बोरामणी, जि.प. शाळा वडजी, जि.प. शाळा गंगेवाडी, जि.प प्राथमिक शाळा संगदरी, जि.प शाळा उळेवाडी, ब्रह्मनाथ विद्यालय मुळेगाव, जि.प. प्राथमिक शाळा इंदिरानगर कासेगाव, जि.प. प्राथमिक शाळा कासेगाव, जि.प. शाळा वरळेगाव, जि.प. प्राथमिक शाळा बक्षी हिप्परगे, जि.प. शाळा उळे, शारदा निकेतन विद्यालय, स्प्रिंगफील्ड प्री-स्कूल उळे आणि ग्लोबल इंग्लिश स्कूल बोरामणी येथील विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थिनींकडून संकलित करण्यात आलेल्या सर्व राख्या १५व्या बटालियन 'द मराठा लाईट इन्फंट्री' तुकडीकडे सुपूर्द करण्यात आल्या. या राख्या बटालियनमार्फत सीमेवर तैनात असलेल्या सैनिक बांधवांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत.

यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते शौर्यचक्राने सन्मानित नायब सुभेदार विजय कुमार यादव व जवान निलेश लोंढे यांच्याकडे सह्याद्री फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थिनींनी बनविलेल्या राख्या सुपूर्द करण्यात आल्या.

यावेळी जिल्हापरिषद सदस्य तथा सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष नेताजी खंडागळे म्हणाले, 'गेल्या पाच वर्षापासून आम्ही सातत्याने 'एक राखी सैनिक बांधवांसाठी' हा उपक्रम राबवत आहोत. दरवर्षी विद्यार्थी आणि शाळांकडून मिळणारा वाढता प्रतिसाद आम्हाला प्रेरणा देतो. आपले सैनिक कुटुंबापासून दूर राहून सीमेवर अहोरात्र देशाचे रक्षण करतात. विद्यार्थिनींनी स्वतःच्या हाताने बनवलेली राखी ही केवळ राखी नसून सैनिक बांधवांप्रती असलेल्या प्रेम, आदर आणि कृतज्ञतेचे प्रतीक आहे. अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेम, देशसेवा आणि सैनिकांप्रती आदराची भावना रुजावी, हाच सह्याद्री फाउंडेशनचा उद्देश आहे.' याप्रसंगी एपीआय उमेश रोकडे, यशवंत खंडागळे, सह्याद्री फाउंडेशनच्या सचिव प्रतिभा खंडागळे, मंजुश्री रोकडे, सुजाता गोरे, सायली उरीट आदी उपस्थित होते.

सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिक बांधवांप्रती प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सह्याद्री फाउंडेशनतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला.

# हुलजंती RTO चेकपोस्ट स्थलांतरासाठी खा प्रणिती शिंदे यांचा पाठपुरावा



**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** हुलजंती व आसपासच्या परिसरातील ग्रामस्थांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार कु. प्रणितीताई शिंदे यांची भेट घेऊन हुलजंती येथील RTO चेकपोस्ट सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याची मागणी केली.

ग्रामस्थांच्या निवेदनाची तातडीने दखल घेत खासदार प्रणितीताई शिंदे यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांना पत्र पाठवून चेकपोस्टचे तात्काळ स्थलांतर करण्याबाबत तसेच परिसरातील शाळांबाहेर गतिरोधक बसविण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी केली.

मौजे हुलजंती, ता. मंगळवेढा येथील RTO चेकपोस्ट सध्या गाव व शाळेच्या जवळच्या परिसरात असल्याने नागरिक, शाळकरी विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि भाविकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या परिसरात मोठ्या संख्येने नागरिक व विद्यार्थ्यांची दैनंदिन ये-जा सुरू असते. तसेच हुलजंती येथील श्री महालिंगराया तीर्थक्षेत्र असल्याने पंढरपूरकडे तसेच कर्नाटकातून ये-जा करणाऱ्या भाविकांची आणि वाहनांचीही मोठी वर्दळ या मार्गावर असते.

RTO चेकपोस्ट परिसरात आतापर्यंत तीन ते चार अपघात झाल्याची माहिती ग्रामस्थांनी निवेदनातून दिली असून, या अपघातांमध्ये दोन व्यक्तींना जीव गमवावा लागला आहे. अनेकदा जड वाहने चेकपोस्ट टाळण्याच्या प्रयत्नात भरधाव वेगाने धावत असल्याने अपघाताचा धोका अधिक वाढत आहे. त्यामुळे पुढील काळात वाहतुकीची गर्दी, कोंडी व संभाव्य अपघात टाळण्यासाठी चेकपोस्टचे योग्य ठिकाणी स्थलांतर करणे अत्यावश्यक असल्याचे खासदार प्रणितीताई शिंदे यांनी पत्रात नमूद केले आहे.

तसेच RTO चेकपोस्टपासून विजयपूरकडे सुमारे अडीच किलोमीटर अंतरावर दोन हायस्कूल असून, पंढरपूरकडे जाणाऱ्या मार्गावर एक जिल्हा परिषद शाळा व एक हायस्कूल आहे. या मार्गावरून दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी ये-जा करीत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने चेकपोस्ट परिसरातील शाळांबाहेर गतिरोधक बसविण्याचीही मागणी खासदार प्रणितीताई शिंदे यांनी केली आहे.

हुलजंती, येळगी, आसबेवाडी, शिवणगी, सोड्डीसह परिसरातील ग्रामस्थांना चेकपोस्टमुळे होणारा त्रास आणि वाढता अपघातांचा धोका लक्षात घेऊन, गाव व शाळेच्या परिसरापासून दूर, वाहतुकीस अडथळा होणार नाही अशा योग्य व सुरक्षित ठिकाणी RTO चेकपोस्टचा पॉईंट तात्काळ स्थलांतरित करावा, अशी मागणी खासदार प्रणितीताई शिंदे यांनी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे केली. तसेच या संदर्भात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती देण्याची विनंतीही त्यांनी केली आहे.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव ॲड. रविकिरण कोळेकर, मंगळवेढा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत साळे, युवा नेते शिवाजी पडवळे, जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार, विकास चोपडे, मलकारी कोटे, बिराप्पा बंडगर, रवी सोमुत्ते, भारत कांबळे, मारुती केंगार, यश थोरवत, चंद्रकांत घोडके, ज्ञानेश्वर हेकडे, यासिन हुजरे, उमेश हुजरे, शाम खुटेकर, शाम हेकडे, मल्लसिद्ध कोळी, महेश पेटर्गे, बबलू चव्हाण, लकेश चव्हाण, मारुती घेडके, राजाराम घोडके, मल्लसिद्ध खुटेकर, रमेश हुजरे, अण्णा सोड्डी यांच्यासह हुलजंती, येळगी, आसबेवाडी, शिवणगी, सोड्डी आदी गावांतील युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खा. प्रणिती शिंदे यांचा अक्कलकोट तालुक्यात गावभेट दौरा उत्साहात



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट तालुक्यातील डोंबर जवळगे, काका पाटील नान्हेगाव परिसरात खासदार प्रणिती शिंदे यांचा गावभेट दौरा उत्साहात पार पडला. यावेळी त्यांनी नागरिक, सरपंच, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच परिसरातील कार्यकर्त्यांशी संवाद साधत विविध समस्या, विकासकामे आणि प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा केली.

खासदार प्रणिती शिंदे यांनी हन्नूर, पितापूर, दहिटणे वाडी, बऱ्हाणपूर आदी परिसरातील नागरिक व कार्यकर्त्यांच्या अडीअडचणी जाणून घेत निवेदने स्वीकारली. यावेळी "तुम्ही कामे आणा, मी काम करण्यास तयार आहे," अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली.

रामपूर-दिंडूर मार्गे डोंबर जवळगे परिसरातील शेतकऱ्यांसाठी उजनीचे पाणी मिळावे, ही प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. गजानन जकिकोरे, हर्षदीप गायकवाड यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे या मागणीचे निवेदन सादर केले.

याप्रसंगी हजरत पटेल, रहीम फुलारी, राजू पाटील, संजय घोडके, प्रवीण हताळे, मल्लिनाथ बंडगर, अनिल उकरांडे, शिवानंद पाटील, शंभू अकतनाळ, तीपाणा हेगडे, रेवणासिद्ध तळवार, समर्थ भरमशेट्टी यांच्यासह परिसरातील नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावभेट दौऱ्यामुळे स्थानिक नागरिकांच्या विविध प्रश्नांना थेट खासदारांसमोर मांडण्याची संधी मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

# 204 आश्रमशाळांमधील 79 हजार 624 विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच एकलव्य मॉडेल निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये आढळणाऱ्या ॲनिमिया अर्थात रक्तक्षयाच्या समस्येचे निर्मूलन करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने ॲनिमिया निवारण कार्यक्रम जाहीर केला आहे. या मोहिमेअंतर्गत अवघ्या दीड महिन्यात राज्यातील 204 शाळांमधील 79 हजार 624 विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन (एचबी) तपासणी पूर्ण करण्यात आली आहे.

ॲनिमियामुक्तीसाठी आदिवासी विकास विभागाने 'सिटिझन्स असोसिएशन फॉर चाईल्ड राईट्स' (सीएसीआर) या संस्थेसोबत सामंजस्य करार केला आहे. त्याअंतर्गत आश्रमशाळांमधील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन पातळी तपासण्यात येत आहे. तपासणी करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये 37 हजार 919 विद्यार्थी आणि 41 हजार 705 विद्यार्थिनींचा समावेश आहे.

यामध्ये 149 शासकीय आश्रमशाळांमधील 55 हजार 868, 48 अनुदानित आश्रमशाळांमधील 22 हजार 420 तसेच 6 एकलव्य शाळांमधील 1 हजार 336 विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली आहे.

**विभागनिहाय तपासणी**

नाशिक विभाग : 104 शाळांमधील एकूण 41 हजार 469 विद्यार्थ्यांची तपासणी पूर्ण झाली आहे. यामध्ये 80 शासकीय आश्रमशाळांमधील 31 हजार 393, 21 अनुदानित आश्रमशाळांमधील 9 हजार 227 आणि 3 एकलव्य शाळांमधील 849 विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

ठाणे विभाग : 81 शाळांमधील एकूण 33 हजार 426 विद्यार्थ्यांची तपासणी झाली असून, त्यात 59 शासकीय आश्रमशाळांमधील 22 हजार 54, 19 अनुदानित आश्रमशाळांमधील 10 हजार 885 आणि 3 एकलव्य शाळांमधील 487 विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अमरावती विभाग : 8 शासकीय आश्रमशाळांमधील 1 हजार 885 आणि 3 अनुदानित आश्रमशाळांमधील 1 हजार 13 अशा एकूण 2 हजार 898 विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली आहे. नागपूर विभाग : 2 शासकीय आश्रमशाळांमधील 536 आणि 5 अनुदानित आश्रमशाळांमधील 1 हजार 295 अशा एकूण 1 हजार 831 विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी पूर्ण झाली आहे.

**कमी हिमोग्लोबिन असलेल्यांना पूरक आहार**

हिमोग्लोबिन तपासणीदरम्यान ज्या विद्यार्थ्यांमध्ये एचबीचे प्रमाण कमी आढळले आहे, अशा विद्यार्थ्यांना आवश्यक पूरक आहार उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राखणे, त्यांच्यातील रक्तक्षयाचे प्रमाण कमी करणे आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस पोषक वातावरण निर्माण करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

**विभागनिहाय विद्यार्थी संख्या**

नाशिक - 41 हजार 469, ठाणे -33 हजार 426, अमरावती - 2 हजार 898, नागपूर - 1 हजार 831.

आदिवासी विद्यार्थ्यांचे सुदृढ आरोग्य आणि दर्जेदार शिक्षण यांना विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. आनिमिया निवारण कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील रक्तक्षयासारख्या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन युद्धपातळीवर तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. अवघ्या दीड महिन्यात 79 हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी पूर्ण झाली आहे, असे आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिकचे उपआयुक्त संतोष ठुबे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

# नेताजी प्रशालेत राखी कार्यशाळा उत्साहात



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** श्रमजीवी नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूलमध्ये रक्षाबंधनानिमित्त राखी बनवण्याच्या कार्यशाळेचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या कार्यशाळेत ५२ विद्यार्थ्यांनी स्व खर्चाने रंगीबेरंगी मणी, झरी, टिकल्या व आकर्षक धाग्यांचा वापर करून सुंदर व कल्पक राख्या तयार केल्या. शिक्षकांनी राखी बनवण्याचे विविध तंत्र व बारकावे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. स्वतःच्या कल्पनेतून राख्या साकारताना विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व हस्तकौशल्याला चालना मिळाली. त्याचबरोबर बहीण-भावाच्या अतूट प्रेमाचा आणि रक्षाबंधन सणाचा संदेशही विद्यार्थ्यांना देण्यात आला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्यांचे शाळेत प्रदर्शन भरवण्यात आले. उद्या शुक्रवार दि.२८ रोजी रक्षाबंधनानिमित्ताने या राख्या शाळेतील विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणासाठी व बहिण भावाचे अतुट प्रेमळ नाते प्रस्थापित करण्यासाठी बांधणार आहेत.

या कार्यशाळेचे आयोजन कलाशिक्षक एस. एस. स्वामी यांनी केले. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या आकर्षक राख्यांचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार व पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीकर सुंकनपल्ली, आरती कुंभार,स्वाती पोटाबत्ती यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.